नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : २९३ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई...
AVP NEWS
समर्थ गांवकरी NEWS
|| जय भगवान ||
समर्थ गांवकरी
संपादक : डॉ.विश्वास आनंदराव आरोटे
मा.नानजीभाई खेमजीभाई ठक्कर
न्याय, निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता... हीच आमची ओळख!
बातम्या, जाहिराती व सदस्यता साठी संपर्क साधा.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासून २००० के व्ही ए
जनरेटर विक्री | दुरुस्ती व देखभाल | तज्ज्ञ तंत्रज्ञ | विश्वासार्ह सेवा वेळेत काम
संपर्क
+91-8286562340 / 9004511593
8652653990 / 8286562350
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053, Sector - 5 Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com | Website: www.adarshengineering.net

गुरुवार दि. ०८ ऑक्टोंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीबाबत मुख्यमंत्र्यांकडून अमित शाह यांना माहिती

## केंद्र सरकारकडून विशेष मदतीची मागणी; केंद्रीय पथकाकडून आठ ऑक्टोबरपासून महाराष्ट्राची पाहणी

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन दिवसीय दिल्ली दौऱ्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीत मुख्यमंत्र्यांनी शाह यांना महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थितीची आणि राज्य सरकार याबाबत करत असलेल्या उपाययोजनाची माहिती देऊन केंद्र सरकारकडून विशेष मदतीची मागणी केली. यासोबतच मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याशी नागपूर विमानतळाच्या विस्तारीकरणासंदर्भात महत्वपूर्ण चर्चा केली. या चर्चेमुळे नागपूर विमानतळासाठी आवश्यक असणारी संरक्षण विभागाची २७ एकर जागा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्री शाह यांच्यासोबत झालेल्या भेटीत राज्य सरकारने केंद्राकडे पाठविलेल्या आगाऊ प्रस्तावाची प्रतही दिली. राज्यातील सुमारे ३२ जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची गंभीर परिस्थिती असून जवळपास ८० टक्के तालुके दुष्काळाने बाधित असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. दुष्काळाच्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान महाराष्ट्रातील विविध भागांचा दौरा करणार आहे. या पथकाकडून प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर केला जाणार असून, राज्याने पाठविलेला प्रस्ताव आणि पथकाचा अहवाल यांच्या आधारे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीअंतर्गत मदतीबाबत निर्णय होणार आहे. केंद्राकडून महाराष्ट्राला जास्तीत जास्त मदत देण्यात येईल,असे सांगून केंद्रीय मंत्री शाह यांनी केंद्र सरकार भक्कमपणे महाराष्ट्राच्या पाठीशी उभे राहील, असे आश्वस्त केल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याशी झालेल्या चर्चेचा संदर्भ देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, उपग्रह प्रतिमांच्या निकषांबरोबरच पावसातील खंड, भूजल पातळी, पिकांचे नुकसान आणि प्रत्यक्ष पाहणी यांसारख्या अन्य निकषांचाही विचार केला जाणार आहे. काही तालुके उपग्रह प्रतिमांच्या निकषात बसत नसले तरी इतर निकषांवर पात्र ठरत असल्यास त्यांचाही विचार केला जाईल. सुमारे २० तालुक्यांमध्येही पिकांच्या नुकसानीच्या आधारे दुष्काळी मदत देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### राज्याच्या निधीतून शेतकऱ्यांना तातडीने मदत

केंद्राकडून मदत मिळण्यास वेळ लागू शकतो, त्यामुळे राज्य सरकार आपल्या उपलब्ध संसाधनांतून शेतकऱ्यांना प्रथम मदत करण्याच्या तयारीत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. सुमारे २३ हजार गावांमध्ये काही पिकांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून उर्वरित सर्वेक्षणाची कार्यवाहीही वेगाने सुरू आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत देण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

### नागपूर विमानतळासाठी २७ एकर जागा हस्तांतराचा मार्ग मोकळा

मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचीही भेट घेतली. नागपूर विमानतळाच्या नव्या टर्मिनल इमारतीसाठी आवश्यक असलेल्या २७ एकर जागेचा प्रश्न या बैठकीत चर्चिला गेला. ही जागा सध्या भारतीय वायुदलाच्या ताब्यात आहे. नवीन टर्मिनलच्या कामासाठी आवश्यक जागा तातडीने हस्तांतरित करण्यास वायुदलाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. उर्वरित भागासाठी आवश्यक बांधकाम पूर्ण करून तो भागही पुढे हस्तांतरित करण्यात येणार आहे. या बैठकीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

बांधकामासाठी आवश्यक अवजड यंत्रसामग्रीच्या हालचालीसाठी वायुदलाच्या परिसरातील हेलिकॉप्टर पार्किंग व अन्य कार्यवाहीच्या अनुषंगाने आवश्यक परवानग्या देण्यासही संरक्षण मंत्रालयाने सहमती दर्शविली असून, त्यासाठी आवश्यक 'एसओपी' तयार करण्यात येणार आहे. यामुळे नागपूर विमानतळाच्या टर्मिनल प्रकल्पासाठी असलेले अडथळे दूर झाल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### एमपीएससी आंदोलनाबाबत सरकारची भूमिका विद्यार्थीहिताची

एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत प्रतिक्रिया देतांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने मांडलेल्या पाचही मागण्यांवर राज्य सरकारने सकारात्मक भूमिका घेतली असून, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांवरील



चौकशीसंदर्भात न्यायालयीन चौकशी करण्यास सरकारने तयारी दर्शविली आहे. चौकशीत गैरप्रकार किंवा गैरवर्तन आढळल्यास संविधानातील कलम ३१७ नुसार पुढील कार्यवाही करण्याची भूमिकाही सरकारने स्पष्ट केली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षामध्ये पारदर्शकता वाढविण्यासाठी व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून, विद्यार्थ्यांसह प्राध्यापक, माजी विद्यार्थी आणि अन्य संबंधित घटकांशी संवाद साधून सुधारणा सुचविण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या प्रश्नाऐवजी आंदोलनाचा राजकीय वापर केला जात असल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली. राज्यातील पोलिसांनी आंदोलनादरम्यान अत्यंत संयमाने परिस्थिती हाताळली असून, विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# ठाण्यात १० ऑक्टोबरला अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी विराट महामोर्चा

**ठाणे (समर्थ गांवकरी)**




संविधानिक आरक्षणातील अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करा, अनुसूचित जातीच्या २०११ च्या जनगणनेनुसार १८ टक्के तर २०२१ नुसार २० टक्के आरक्षण लागू करा या प्रमुख मागण्यांसाठी येत्या १० ऑक्टोबर रोजी ठाणे रेल्वे स्थानक येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा ते कोर्ट नाका येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा असा विराट महामोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चा नंतर ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ जाहीर सभा होणार असल्याची माहिती आज एका पत्रकार परिषदेत अनुसुचित जाती उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा कृती समितीचे ठाणे जिल्हा अध्यक्ष पंढरीनाथ गायकवाड यांनी दिली.

यावेळी पत्रकार परिषदेला केंद्रीय सदस्य प्रा. जगन्नाथ बावा, आबासाहेब चासकर, सुखदेव उबाळे, बाळासाहेब ओव्हाळ, अलका जगताप, आनंद नवसागरे आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्य सरकारने अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याचा घाट घातला आहे. त्यात अ ब क ड अशी जातीची विभागणी करून एससी समाजामध्ये भांडणे लावण्याचा प्रयत्न केला आहे. राज्य शासनाचा हा कुटिल डाव हाणून पाडण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील भीम योद्धा संघर्षास सज्ज झाले आहेत. ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात यासाठी बैठका झाल्या असल्याची माहिती पंढरीनाथ गायकवाड यांनी दिली. सरसेनापती आनंदराज आंबेडकर, डॉ. भीमराव आंबेडकर, डॉ. सुरेश माने, माजी मंत्री बबनराव घोलप, राजकुमार बडोले, माजी आमदार बाबुराव माने, संजय खामकर, शरदचंद्र जाधव आदी मान्यवरांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा निघणार आहे. अनुसूचित जाती मधील संपूर्ण ५९ जाती या उपवर्गीकरण विरोधात एकवटल्या असून लाखोंच्या संख्येने अनुयायी या मोर्चात सहभागी होणार असल्याचे पंढरीनाथ गायकवाड यांनी सांगितले.

# 'मोर्चे काढण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या बांधावर जा'; सुजय विखेंचा निलेश लंकेंवर हल्लाबोल

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थिती आणि 'एसआयआर'च्या मुद्द्यावरून महाविकास आघाडीच्या वतीने काढण्यात येणाऱ्या मोर्चावरून माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी खासदार निलेश लंके यांच्यावर जोरदार टीका केली आहे. मोर्चे काढून राजकारण करण्यापेक्षा आधी शेतकऱ्यांच्या बांधावर जा आणि त्यांची परिस्थिती समजून घ्या,असा थेट टोला विखे यांनी लगावला.

शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी जाणून घेण्याऐवजी इकडे–तिकडे मोर्चे काढत फिरणे ही फालतूगिरी आहे. ही परिस्थिती हास्यास्पद आहे. जिल्ह्याने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी आधी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दुष्काळाची वस्तुस्थिती पाहावी, अशी घणाघाती टीका विखे यांनी केली.

दुष्काळाच्या परिस्थितीत केंद्र सरकारकडून मदत मिळवता येते का, यासाठी प्रयत्न करणे हे लोकप्रतिनिधींचे काम आहे. मात्र ते न करता सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांशी थेट संबंध नसलेल्या विषयांवर रस्त्यावर उतरून मोर्चे काढले जात आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

शेतकऱ्यांना सध्या प्रत्यक्ष मदतीची आवश्यकता असताना त्यांचे प्रश्न सोडून अन्य विषयांमध्ये वेळ घालवला जात असल्याचे सांगत विखे यांनी लंके यांच्या कामकाजावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यापेक्षा मोर्चे काढण्यात धन्यता मानली जात असेल, तर त्यातून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत, असे विखे म्हणाले.

महाविकास आघाडीच्या प्रस्तावित मोर्चाच्या पार्श्वभूमीवर विखे यांनी केलेल्या या आक्रमक टीकेमुळे अहिल्यानगरमधील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे.

# महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणीस राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद : मंत्री दत्तात्रय भरणे

## महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणीसाठी ३७ लाखांहून अधिक महिलांचे अर्ज प्राप्त

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

महिला शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीतील योगदानाची अधिकृत ओळख मिळावी, यासाठी सुरू करण्यात आलेल्या महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणीसाठी राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ७ ऑक्टोबर पर्यंत राज्यभरातून तब्बल ३७ लाख ९३ हजार ५१ अर्ज प्राप्त झाले आहेत. राज्यातील प्रत्येक पात्र महिला शेतकरी या उपक्रमाशी जोडली जावी, यासाठी कृषी विभागामार्फत सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत, असे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाने नुकतेच 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण कायदा, २०२६' विधेयक पारित केले आहे. त्यानुसार महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख, समान अधिकार आणि शासनाच्या कृषी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शेतकरी महिला प्रमाणपत्र देण्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली आहे.

७ ऑक्टोबर पर्यंत राज्यभरातून तब्बल ३७ लाख ९३ हजार ५१ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी राज्यातील ८९५ ग्रामपंचायतींनी ग्रामसभा घेऊन ६८ हजार ४३६ महिलांना शेतकरी महिला प्रमाणपत्र वितरित करण्यात आले आहे. ग्रामसभा झाल्यानंतर पुढील १५ दिवसांमध्ये शेतकरी महिलांना प्रमाणपत्र वितरित केले जाते. विदर्भ आणि मराठवाड्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणात नोंदणी होत आहे.

अर्जसंख्येत यवतमाळ जिल्हा आघाडीवर असून, तेथून २ लाख ५३ हजार ४३९ अर्ज प्राप्त झाले आहेत. सातारा २ लाख १४ हजार ७८७, नाशिक २ लाख १० हजार ३२७, अमरावती २ लाख ५ हजार ७४, पुणे १ लाख ७३ हजार ४९ एवढे अर्ज प्राप्त झाले आहेत. याशिवाय बुलढाणा, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, नंदुरबार, जळगाव, नांदेड, धाराशिव, धुळे, बीड आणि जालना जिल्ह्यांतून एक लाखांहून अधिक महिला शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. तालुकानिहाय नोंदणीत सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात सर्वाधिक ३५ हजार ४२२ नोंदणी झाली आहे.

कृषी विभागाच्या माध्यमातून जिल्हा व तालुकानिहाय नोंदणीचे सातत्याने संनियंत्रण केले जात असून, कमी नोंदणी असलेल्या भागांत जनजागृती करून नोंदणीला गती देण्यात येत आहे. अशी माहिती कृषी आयुक्त सुरज मांढरे यांनी दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ हा कालावधी 'सेवा संकल्प अभियान' म्हणून साजरा होत असून, १७ सप्टेंबर रोजी महिला शेतकरी प्रमाणपत्राच्या ऑनलाइन पोर्टलचा शुभारंभ करण्यात आला. या सेवा संकल्प अभियानात आतापर्यंत राज्यातील विविध विभागांच्या तुलनेत कृषी विभागात सर्वाधिक नोंदणी झाली असून, महिला शेतकऱ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सर्वाधिक



सहभाग नोंदविला आहे. हा सहभाग महिला शेतकऱ्यांचा शासनाच्या योजनांबाबत वाढता विश्वास आणि सक्रिय सहभाग दर्शविणारा आहे, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले. तसेच राहिलेल्या महिलांनी लवकरात लवकर ऑनलाइन नाव नोंदणी करुन घ्यावी असेही त्यांनी आवाहन केले.

## संक्षिप्त

### महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ३७ लाखांहून अधिक अर्ज

राज्यातील प्रत्येक पात्र महिला शेतकरी या उपक्रमाशी जोडली जावी, यासाठी कृषी विभागाकडून नोंदणीला गती देण्यात येत असल्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६'नुसार महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख, समान अधिकार आणि शासनाच्या कृषी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्राची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**मुंबई :** शेतीतील महिलांच्या योगदानाला ओळख देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणीला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत असून, ७ ऑक्टोबरपर्यंत तब्बल ३७ लाख ९३ हजार ५१ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ८९५ ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा घेण्यात आली असून, ६८ हजार ४३६ महिलांना महिला शेतकरी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले आहे. राज्यातील प्रत्येक पात्र महिला शेतकरी या उपक्रमाशी जोडली जावी, यासाठी कृषी विभागाकडून नोंदणीला गती देण्यात येत असल्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६'नुसार महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख, समान अधिकार आणि शासनाच्या कृषी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्राची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### मुंबईत ८ व ९ ऑक्टोबर रोजी सायरन यंत्रणेची चाचणी

**मुंबई :** देशाची आर्थिक राजधानी आणि महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहराच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासन व विविध यंत्रणा सदैव सतर्क असतात. मुंबई हे संवेदनशील आणि महत्त्वाचे शहर असल्याने येथे नागरिकांच्या संरक्षणासाठी सातत्याने विविध उपाययोजना राबवल्या जातात. याच सुरक्षेच्या व आपत्कालीन सज्जतेच्या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेने (इचउ) मुंबईकरांसाठी एक अत्यंत महत्त्वाचे आवाहन केले आहे. मुंबई शहरामध्ये ८ आणि ९ ऑक्टोबर रोजी नव्या तंत्रज्ञानावरील 'प्रोटोटाइप सायरन' उपकरणाची प्रात्यक्षिक चाचणी घेतली जाणार आहे. या चाचणी दरम्यान परिसरात तीव्र सायरनचा आवाज ऐकू येण्याची शक्यता आहे. त्यामुळे अचानक वाजणाऱ्या या सायरनमुळे नागरिकांनी अजिबात घाबरून जाऊ नये किंवा शहरात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती अथवा धोका निर्माण झाल्याचा गैरसमज करू नये, अशी विनंती प्रशासनाने केली आहे.

### मध्य रेल्वेच्या ५ आणि ६व्या लाईनच्या प्रकल्प कामाला गती

या जागेवर एकूण ४२ वृक्ष अस्तित्वात आहेत. या जागेवरील जागेवरील ४२ (बेचाळीस) वृक्ष नियोजित माटुंगा वर्कशॉपच्या बांधकामात उत्खननात बाधित होत आहेत.

**मुंबई :** मध्य रेल्वेच्या ५ वी व ६ वी लाईन प्रकल्प अंतर्गत, मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल ते कुर्ला रेल्वेच्या मधील माटुंगा वर्कशॉपच्या प्रस्तावित बांधकामात येणारी झाडे काढण्यास वृक्ष प्राधिकरणाची परवानगी मिळाली आहे. या प्रकल्पांतर्गत या दोन्ही मार्गाच्या कामांमध्ये ४२ झाडे बाधित होत असून यामध्ये २९ झाडे कापली जाणार आहेत. तर १३ झाडे पुनर्रोपित केली जाणार आहे. महापालिकेच्या 'जी/उत्तर' विभागातील, मध्य रेल्वे ५ वी व ६ वी लाईन प्रकल्प अंतर्गत मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल ते कुर्ला रेल्वेच्या मधील माटुंगा वर्कशॉपच्या प्रस्तावित बांधकामात येणारी २९ (एकोणतीस) वृक्ष कापण्यास व १३ (तेरा) वृक्ष पुनर्रोपित करण्यास अशी एकूण ४२ (बेचाळीस) वृक्ष काढण्याची मध्य रेल्वेच्यावतीने महापालिका वृक्ष

# हंगा गावात आजही साधेपणाची नाळ जपणारे लंके कुटुंब

## खासदार निलेश लंके यांचा थक्क करणारा जनसेवेचा प्रवास!



: लेखन :
**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके यांच्या हंगा येथील परिवाराची भेट घेतली असता त्यांच्या साधेपणाची आणि जनतेशी असलेल्या घट्ट नात्याची प्रचिती आली. खासदार झाल्यानंतरही आलिशान बंगला, दिखाऊपणा किंवा श्रीमंतीचा थाट न स्वीकारता लंके कुटुंब आजही जुन्या घरात, साध्या वातावरणात जीवन जगताना दिसते. साधे घर, घरावर पत्र्याचे छप्पर, जुन्या पद्धतीचे दरवाजे आणि घरातील साधेपणा पाहिल्यानंतर येथे लोकसभेचा खासदार राहतो, यावर क्षणभर विश्वास बसणार नाही. एकेकाळी जिल्हा परिषद सदस्य तसेच विविध समित्यांवर जबाबदाऱ्या सांभाळलेल्या राणीताई लंके आजही घरातील कामे स्वतः करतात. आई-वडील, पत्नी, भाऊ आणि परिवारातील सदस्य आजही सामान्य माणसाप्रमाणे प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होताना दिसतात.

खासदार निलेश लंके यांच्या घरातील एक छोटी खोली म्हणजे त्यांचे वैयक्तिक निवासस्थान आणि समोरचे छोटे कार्यालय. खोलीत आयुर्वेदिक औषधे, झोपण्यासाठी साधी कॉट आणि जनतेच्या कामासाठी आवश्यक असलेले छोटे कार्यालय एवढीच व्यवस्था. सकाळी उठल्यापासून जनतेच्या कामाला सुरुवात होते. कार्यकर्ते, पदाधिकारी आणि वैयक्तिक सचिवांच्या माध्यमातून विविध भागातील प्रश्नांबाबत फोनवरून माहिती घेत कामाचा पाठपुरावा सुरू असतो. मणक्याच्या आजारावर मात करूनही लंके परिवार २४ तास जनतेच्या प्रश्नांसाठी धावपळ करताना दिसतो. लहान भाऊ आजही किराणा दुकान चालवतो आणि त्याच दुकानाच्या वरच्या छोट्याशा खोलीतून खासदारांचे संपर्क कार्यालय चालते. या कार्यालयातून दररोज असंख्य नागरिकांची कामे मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा केला जातो. विशेष म्हणजे पवार कुटुंबीयांसह अनेक मान्यवरांनी याच साध्या घरात





भोजनाचा आस्वाद घेतला असून, आजही या घरातून येणाऱ्या प्रत्येकाला चहा-पाणी आणि जेवण देण्याची परंपरा कायम आहे.

कोविड काळात उभारलेल्या रुग्णालयापासून ते लोकसभेतील खासदारकीपर्यंतचा निलेश लंके यांचा प्रवास थक्क करणारा आहे. हंगा हे छोटेसे गाव आता त्यांच्या कार्यामुळे देशाच्या नकाशावर ओळखले जात आहे. गावातील मंदिर, वारकरी संप्रदायाची परंपरा, प्रत्येकाच्या गळ्यातील तुळशीची माळ आणि गावातील एकजूट ही या परिवाराच्या संस्कारांची ओळख आहे. गावातील एखाद्याने नवीन वाहन घेतले तरी त्याची पूजा आपल्या नेत्याच्या हस्ते व्हावी, अशी गावकऱ्यांची भावना असते; तर कुणाच्या घरात आनंदाचा प्रसंग असो किंवा दुःखाचा, त्यात सहभागी होणे हे आपले कर्तव्य असल्याचे लंके सांगतात. प्रस्थापित आणि साखरसम्राटांच्या विरोधात राजकीय लढा देतानाही टीका-टिप्पणीची पर्वा न करता जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ नये, हा ध्यास त्यांनी कायम ठेवला आहे. कुणी करा निंदा, कुणी करा वंदा; काम करत राहणे हाच माझा धंदा, या भूमिकेतून सुरू असलेली त्यांची गडकोट चळवळ आज अनेक तरुणांना प्रेरणा देत आहे. खासदारकी मिळाली, सत्ता मिळाली; मात्र पाय जमिनीवरच ठेवून जनतेशी नाळ कायम ठेवणारा हा परिवार हंग्यात गेल्यानंतरच खऱ्या अर्थाने अनुभवता येतो.

# कारखान्यांपेक्षा दुष्काळाकडे लक्ष द्या!

## बैलगाड्यांसह इंडिया आघाडीचा सरकारविरोधात धडक मोर्चा
## शेतकरी, पशुधन आणि पाणीप्रश्नावर तातडीच्या उपाययोजनांची मागणी

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्ह्यात दुष्काळाची तीव्रता वाढत असताना शेतकरी, पशुधन आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी करत इंडिया आघाडीच्या वतीने अहिल्यानगर येथे बैलगाड्यांसह सरकारविरोधात धडक मोर्चा काढण्यात आला. कारखान्यांपेक्षा दुष्काळाकडे लक्ष द्या असा संदेश देत शेतकऱ्यांना पाणी, जनावरांना चारा आणि दुष्काळग्रस्तांना तातडीची आर्थिक मदत मिळावी, अशी म ागणी मोर्चातून करण्यात आली.

दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकरी आणि पशुपालक म ोठ्या संकटात सापडले आहेत. अनेक भागांत पाण्याचा प्रश्न गंभीर असून पशुधनासाठी चारा उपलब्ध होण्याबाबतही अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे शासनाने केवळ घोषणा न करता दुष्काळग्रस्त भागात प्रत्यक्ष उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका इंडिया आघाडीच्या नेत्यांनी मांडली.

मोर्चाला संबोधित करताना अंबादास दानवे यांनी सरकारच्या प्राधान्यक्रमावर प्रश्न उपस्थित केला. जिल्ह्यात मोठमोठे कारखानदार असले तरी सध्या कारखान्यांपेक्षा दुष्काळाच्या प्रश्नाकडे शासनाने प्राधान्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

मोठ्या उद्योगांना मदत करण्यापेक्षा दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकरी आणि पशुधनाला मदत करणे आवश्यक आहे. जनावरांना चारा आणि पाणी मिळणे ही तातडीची गरज असून शासनाने त्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शासनाकडून घोषणा केल्या जात असल्या तरी प्रत्यक्ष मदत किती मिळत आहे, असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन गावागावांत पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

खासदार नीलेश लंके यांनीही सरकारवर टीका करत जनतेच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मोर्चे काढावे लागत असल्याचे सांगितले. दुष्काळ, पेपरफुटी आणि एसआयआर यांसारख्या प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

दुष्काळाचे वास्तव अधोरेखित करण्यासाठी मोर्चात बैलगाड्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित असलेल्या बैलगाड्यांसह निघालेल्या मोर्चातून ग्रामीण भागातील दुष्काळाची परिस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी, शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक मदत आणि पशुधनासाठी चारा-पाण्याची व्यवस्था तातडीने





करण्यात यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

या मोर्चात आमदार सुनील शिंदे, प्रताप पाटील शेळके, संपतराव म्हस्के, बाळासाहेब हराळ, माधवराव लामखडे, सिताराम काकडे, योगीराज गाडे, संदीप वर्पे, राजेंद्र दळवी, किरण काळे, शिवा पाटील होळकर, संजय गारुडकर, अरुण म्हस्के, अर्जुन भालेकर, डॉ. भास्कर शिरोळे, रामेश्वर निमसे, निलेश मालपाणी, रामदास गोल्हार, जगदीश चौधरी, सचिन कोते, किरण पाटील, सचिन गुजर, दीप चव्हाण, ड. सुभाष लांडे, बन्सी सातपुते, प्रवीण सोनवणे, राजू आघाव, मनसेचे सचिन डफळ, योगिता राजळे, अर्चना गायकवाड, सुवर्णा धाडगे यांच्यासह इंडिया आघाडीतील विविध तालुकाध्यक्ष तसेच विविध फ्रंटल संघटनांचे अध्यक्ष उपस्थित होते.

# राजूर महावितरण कार्यालयाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर
## नागरिकांच्या तक्रारींचा पाढा!

**राजूर (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील राजूर येथील महावितरण कार्यालयातील कामकाजाबाबत नागरिकांच्या तक्रारी वाढत असून, नुकत्याच झालेल्या आढावा बैठकीत माजी आमदार वैभवराव पिचड यांनी महावितरणच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले. ग्राहकांच्या समस्या वेळेत सोडवल्या जात नसल्याने सामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले.

नागरिकांच्या प्रमुख तक्रारी :

१. मीटर रीडिंग न घेणे – अनेक ठिकाणी प्रत्यक्ष घरी न जाता अंदाजाने मीटर रीडिंग घेतले जात असल्याचा आरोप.

२. अव्वाच्या सव्वा वीजबिले – प्रत्यक्ष वीजवापरापेक्षा अधिक रकमेची बिले येत असल्याने गोरगरीब ग्राहकांवर आर्थिक भार पडत असल्याची तक्रार.

३. वेळेवर वीजबिले न मिळणे – ग्राहकांना बिले वेळेत मिळत नसल्याने मुदतीत बिल भरता येत नाही आणि नाहक दंड भरावा लागतो.

४. कार्यालयात अधिकारी-कर्मचाऱ्यांची गैरहजेरी – कार्यालयातील पंखे, दिवे व संगणक सुरू असतानाही अधिकारी व कर्मचारी आपल्या जागेवर उपलब्ध नसल्याच्या तक्रारी.

# पारनेर कारखाना खरेदीला पैसा पुरविल्याची चोरडियांची कबुली....!

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

देवीभोयरे येथील पारनेर सहकारी साखर कारखाना खरेदी करिता पुण्याचे माजी खासदार विदुरा नवले यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील आठ सदस्यांना सुमारे तेवीस कोटी रुपये दिल्याची कबुली पुण्याच्या पंचशिल गृपचे बांधकाम उद्योजक चोरडिया बंधूंनी पोलिसांना चौकशी दरम्यान दिली आहे, अशी माहिती कारखाना बचाव समितीचे वकील आणि फिर्यादि रामदास घावटे यांनी दिली आहे. गेल्या आठवड्यात या गुन्ह्याच्या तपासाकामी पारनेर पोलिसांनी पुण्याचे उद्योजक अतुल चोरडिया व अशोक चोरडिया यांना नोटीस बजावले होते. त्यानंतर, चोरडीया बंधूंनी तपासा दरम्यान सांगितले की, सन २०१५ ला त्यांनी पुण्यातील मौजे ताथवडे येथील नवले कुटुंबीयांकडून सुमारे एक हेक्टर शेत जमीन नोटरी कराराने विकासना करिता त्यांनी घेतली होती, व त्या बदल्यात त्यांना पारनेर साखर कारखाना खरेदीसाठी लागणारी सुमारे तेवीस कोटी रुपये रक्कम अँडव्हान्स पोटी दिली होती. परंतु पुढे दोन वर्षांनी त्यांचे नवले कुटुंबियांशी वाद झाल्यानंतर, त्यांनी विकासनाचा झालेला करार रद्द केला.

त्यानंतर नवले कुटुंबीयांना दिलेली तेवीस कोटी रुपये रक्कम सन २०१८ ला पुन्हा मागे घेतली असल्याचे त्यांनी जबाबात सांगितले आहे. तसेच त्याबाबतची कागदपत्रे देखील पोलिसांकडे जमा केली आहेत.

चोरडीया व नवले बंधूंनी जमीन विकासनाच्या नावाखाली संगनमताने अशाप्रकारे केवळ कागदोपत्री बोगस करारनामाच्या आडून हा पैसा उपलब्ध केल्याचे दाखवून त्या रकमेतून पारनेर साखर कारखाना खरेदी केला. पुढे लगेचच त्याच मालमत्तेवर महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेकडून सुमारे ३४० कोटी रुपयांचे कर्ज काढले,आणि चोरडिया बंधूकडून घेतलेल्या अँडव्हान्स रकमा पुन्हा मागे दिल्याचे दाखविले आहे.

याबाबत फिर्यादिने सांगितले की, चोरडीया आणि नवले बंधूंनी कारखाना खरेदीसाठी जमीन विकासनाच्या नावाखाली खोट्या, कागदोपत्री आणि बोगस करारनाम्याच्या नावाखाली असा निधी (पैसा) उभारल्याचा कट करून पारनेर कारखान्याची मालमत्ता बेकायदा पद्धतीने खरेदी केल्याचे म्हटले आहे. फिर्यादि यांनी घेतलेल्या माहीती नुसार विकासणाच्या ठिकाणी पुण्यातील ताथवडे येथे सध्या तिसऱ्याच बांधकाम कंपनीचे काम उभे आहे. यावरून,

आरोपी असलेल्या नवले कुटुंबाला हा गुन्ह्या करण्यासाठी आर्थिक रसद आणि मदत केल्याचे तपासात उघड झाल्यामुळे, आता नवले कुटुंबातील नऊ आरोपींच्या सोबत चोरडीया बंधूंनाही या गुन्ह्यात सह -आरोपी करण्याची मागणी कारखाना बचाव समितीने पोलिसांकडे केली आहे.

अक्षर लँड डेव्हलपर्स कंपनीचीहि चौकशी व्हावी....!

पारनेर साखर कारखाना खरेदि गैरव्यवहारात अक्षर लँड डेव्हलपर्स या खाजगी कंपनीने सुमारे नऊ कोटी रुपये आरोपींना पुरविल्याचे पुरावे समोर आले आहेत. अक्षर लँड डेव्हलपर्स ही कंपनी एका बड्या राजकीय महिला नेत्याशी संबंधित आहे.

या कंपनीत विद्यमान खासदार असलेल्या या महिला नेत्याची भागीदारी देखील आहे.

तसेच या महिला खासदार नेत्याचे आरोपी असलेल्या नवले व चोरडीया या दोन्ही कुटुंबियांशी अत्यंत जवळचे संबंध आहे.

त्यामुळे या गुन्हातील आरोपिंना या महिला नेत्याच्या कंपनीने सुमारे नऊ कोटी रुपये कशासाठी पुरविले याबाबतही सखोल चौकशीची मागणी फिर्यादी असलेल्या कारखाना बचाव समितीने तपासी अधिकारी सोमनाथ दिवटे यांच्याकडे केली आहे.

# डिजिटल युगातील पिढीला घडले 'शिवतीर्थ रायगड'चे दर्शन

## अळकुटी साईनाथ हायस्कूलच्या एस.एस.सी. १९९८ माजी विद्यार्थ्यांचा उपक्रम

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

बुधवार दि. ७ आक्टो. २०२६ आजची नवी पिढी मोबाईल, व्हिडिओ गेम्स आणि डिजिटल जगतात हरवून जात असताना, त्यांना आपल्या गौरवशाली इतिहासाची प्रत्यक्ष अनुभूती देण्यासाठी अळकुटी येथील साईनाथ हायस्कूलच्या १९९८ एस एस सी. च्या माजी विद्यार्थ्यांनी एक कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मुलांसह थेट 'शिवतीर्थ रायगड' किल्ल्याची सफर करत नव्या पिढीला इतिहासाचा खरा वारसा दाखवला. या विशेष मोहिमेत एकूण ४० जणांचा समुह सहभागी झाला होता. मोबाईल युगात हरवलेली मुले बाहेर काढण्याचा सहलीचा मुख्य उद्देश नव्या पिढीला केवळ किल्ले दाखवणे हा नसून, त्यांच्या बालमनावर छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि शिवसंस्कार बिंबवणे हा होता.

२७०० फूट उंच असलेला रायगड पायथा पाचाड येथून पायऱ्यांनी सर करताना बालगायिक सुखदा थोरात हिने नमो शिवाजी राजा गायनातून मानवंदना देऊन, कड्या कपाऱ्यातून जाणारी रायगडाच्या वारीचा आनंद सर्वांनी घेतला. विविध फुलांनी



बहरलेली फुललेला रायगड डोंगर परिसर मन मोहून टाकणारा होता.

हिरकणी कडा अभेद्य असा गडाचा मुख्य आणि अत्यंत मजबूत प्रवेशद्वार महादरवाजा, राजसभा आणि सिंहासन, ऐतिहासिक वारसा लाभलेल्या शिवाजी महाराजांच्या शौर्याचे प्रतीक असलेल्या अवशेष, इतिहास डोळ्यांनी पाहताना, ऐकताना बॅचमधील सर्वजण भारावून गेले. क्षणभर महिला भगिनींच्या डोळ्यांत अश्रु तरळले.

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय
### ता. अकोले, जि. अहिल्यानगर

क्र.कावि/फौजदारी / वारस नोंद/२५/२०२६ अकोले दि. ०१/०९/२०२६

श्रीम. शशिकला बबन कवडे, रा. बेलापुर, ता.अकोले, जि.अहिल्यानगर यांचे पती कै. बबन भिमराज कवडे हे दि. २०/०४/२०२६ रोजी डॉ. पिसे हॉस्पिटल वडगाव आनंद (आळेफाटा) येथे मयत झाले. सदर मयत व्यक्ती हे सेवा निवृत्त पंचायत समिती अंतर्गत ग्रामविकास अधिकारी येथे या पदावर कार्यरत होते. मयत व्यक्तीच्या वारसांना शासनाकडून देय रक्कमा मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केला असुन त्यात खालीलप्रमाणे वारस असल्याचे दर्शविले आहे.

| अक्र. | वारसाचे नाव | वय वर्ष | नाते |
|---|---|---|---|
| १ | शशिकला बबन कवडे | ६५ | पत्नी |
| २ | श्रीकांत बबन कवडे | ४० | मुलगा |
| ३ | स्वाती बाळासाहेब कोबरणे | ४६ | मुलगी |
| ४ | रेश्मा गणेश बोरुडे | ४३ | मुलगी |

या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील वारस प्रमाणपत्र बाबतचे कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह लेखी स्वरुपात या जाहीर प्रकटनाच्या तारखेपासून ७ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधितांस वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. १५ अहिल्यानगर यांचे कार्यालय,

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ खालील प्राथमिक अधिसूचना

### अधिसुचना

क्रमांक: भूसं/मौजे दुरगाव, ता.कर्जत/एस.आर ०३/२०२६.

ज्याअर्थी, भूमीसपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमांच्या कलम ३ च्या खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल :

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, अहिल्यानगर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी सम्पादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे. आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे. त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही. परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी क्रमांक/भूसं/१६-अ/ई-३२४०५९३/२०२६ दि.२७/०४/२०२६ रोजीचे आदेशानुसार उपजिल्हाधिकारी भूमीसंपादन क्र. १५ अहिल्यानगर यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची – एक** **जमीनीचा तपशील**

**गाव मौजे दुरगाव** **तालुका कर्जत** **जिल्हा अहिल्यानगर**

| अ.क्र. | गट नंबर | आवश्यक जमिनीचे अंदाजित क्षेत्र हे.आर चौ मी |
|---|---|---|
| १ | ४०८ पैकी | ०.०३२० |
| २ | ४१० पैकी | ०.११ |
| ३ | ४१२ पैकी | ०.०४ |
| ४ | ४१८ पैकी | ०.२६ |
| ५ | ४१९ पैकी | ०.१६ |
| ६ | ४०९/१ पैकी | ०.०६ |
| | ४०९/२ पैकी | |
| | ४०९/३ पैकी | |
| ७ | ४२१ पैकी | ०.३२ |
| एकुण | | ०.९८२० |

**अनुसूची – दोन** **सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नांव** :- कुकडी डावा कालवा लघुवितरीका क्र.७५ वरील कि.मी.५ व ६ साठी जमिनीचे भूसंपादन मौजे दुरगाव ता. कर्जत, जि-अहिल्यानगर (एस.आर.क्र ०३/२०२६)

**प्रकल्प कार्याचे वर्णन** :- कुकडी डावा कालवा लघुवितरीका क्र.७५ वरील कि.मी.५ व ६ साठी जमिनीचे भूसंपादन मौजे दुरगाव ता. कर्जत, जि-अहिल्यानगर (एस.आर.क्र ०३/२०२६)

**समाजाला मिळणारे लाभ** :- कुकडी डावा कालवा लघुवितरीका क्र.७५ वरील कि.मी.५ व ६ साठी जमिनीचे भूसंपादन मौजे दुरगाव ता. कर्जत, जि-अहिल्यानगर अंतर्गत येणाऱ्या गावांतील शेतजमिनीला सिंचनासाठी व पिण्यासाठी पाणी पुरवठा (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा, सोयीसुविधा व इतर लाभांसंबंधात)

**अनुसूची – तीन** बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे – लागु नाही.

**अनुसूची – चार** **(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :-** प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक – नाशिक विभागीय पुरवणी दि.१७.०९.२०२६ नुसार भुसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ प्रकरण दोनच्या व प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.

**अनुसूची – पाच** **नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील :-**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम :- लागु नाही.

ब. प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता :- लागु नाही.

क. ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्त करण्यात आली आहे.त्या अधिसूचनाचा तपशील :- लागु नाही.

टिप-उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र. १५, जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**(गौरी सावंत)**
**उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र. १५,**
**अहिल्यानगर**

**दिनांक :- २८/०९/२०२६**
ठिकाण:-अहिल्यानगर

जिमाका/नगर/जाहि/१३४/२०२६

## दुष्काळावर बोलू काही?

# पतसंस्था व सावकारांची वसुली थांबवा; शैक्षणिक शुल्काबाबत शासनाच्या जीआरची तातडीने अंमलबजावणी करा : डॉ. विश्वासराव आरोटे

**अकोले (समर्थ गांवकरी)**

दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीमुळे शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी आणि पालक वर्ग मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत असताना शासनाने जाहीर केलेल्या विविध सवलती आणि योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. एकीकडे शेती व रोजगारावर दुष्काळाचा परिणाम होत असताना दुसरीकडे पतसंस्था, खासगी सावकारांकडून होणारी कर्जवसुली आणि शैक्षणिक संस्थांकडून सुरू असलेली फी वसुली यामुळे सामान्य कुटुंबांवरील आर्थिक ताण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळावर बोलू काय? या विषयावर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सविस्तर भूमिका मांडली.



दुष्काळी परिस्थितीचा विचार करून शासनाने शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध योजना, सवलती व उपाययोजना जाहीर केल्या आहेत. मात्र शासन निर्णय (जीआर) जाहीर झाल्यानंतर त्याची प्रभावी अंमलबजावणी तळागाळापर्यंत होत नसेल, तर त्या घोषणांचा लाभ संबंधितांना मिळणार कसा, असा प्रश्न डॉ. आरोटे यांनी उपस्थित केला. दुष्काळामुळे उत्पन्नाचे स्त्रोत कमी झालेले असताना कर्जदारांकडून सक्तीची वसुली सुरू राहिल्यास संकट आणखी तीव्र होऊ शकते. त्यामुळे दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन पतसंस्था तसेच सावकारांकडून होणाऱ्या वसुलीबाबत शासनाने तातडीने स्पष्ट निर्देश देऊन गरजू कुटुंबांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

दुष्काळाचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित नसून त्याचे पडसाद शिक्षण क्षेत्रावरही उमटत आहेत. अनेक पालकांच्या उत्पन्नावर परिणाम झाल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत शैक्षणिक संस्थांकडून फी वसुली सुरू असल्याने पालक वर्गामध्ये चिंता निर्माण झाली आहे. शासनाने दुष्काळी परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काबाबत जाहीर केलेल्या निर्णयांची आणि संबंधित जीआरची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. कोणताही विद्यार्थी केवळ आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी शासन आणि संबंधित शैक्षणिक संस्थांनी संवेदनशील भूमिका घेणे आवश्यक असल्याचे डॉ. आरोटे यांनी स्पष्ट केले.

आज शेतकरी दुष्काळामुळे अडचणीत आहे, पालक आर्थिक संकटात आहेत आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत शासनाने केवळ योजना जाहीर करून चालणार नाही, तर त्या योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतो आहे की नाही, याची जबाबदारी निश्चित केली पाहिजे, अशी भूमिका डॉ. विश्वासराव आरोटे यांनी मांडली.

दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता कर्जवसुली, शैक्षणिक शुल्क, पाणीटंचाई, रोजगार आणि शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी या सर्व प्रश्नांकडे प्रशासनाने एकत्रितपणे पाहण्याची गरज आहे.




दुष्काळग्रस्त कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही, यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्याची मागणीही त्यांनी केली. शासनाने जाहीर केलेल्या निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून सर्वसामान्यांना दिलासा देणे हीच सध्याच्या परिस्थितीत खरी गरज असल्याचे डॉ. आरोटे यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### सायबर गुन्ह्यांपासून सावध राहा; 'क्लिक' करण्यापूर्वी विचार करा



**मुंबई :** डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर आणि त्यातून होणाऱ्या सायबर फसवणुकीचे वाढते प्रकार लक्षात घेऊन नागरिक, अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी 'सेवा संकल्प अभियान'अंतर्गत दक्षिण सायबर पोलीस ठाण्याच्या वतीने जे. जे. रुग्णालयाच्या फार्मसी विभागात तसेच संरक्षण मंत्रालय कक्षात विशेष 'सायबर जनजागृती' वर्गाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात सायबर सुरक्षेचे सहायक पोलीस निरीक्षक दीपक देसले आणि पोलीस कॉन्स्टेबल इम्रान मुलाणी यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, फसवणुकीच्या पद्धती आणि त्यापासून बचाव करण्यासाठी घ्यावयाच्या खबरदारीबाबत सविस्तर माहिती दिली.

'डिजिटल अरेस्ट'च्या नावाने होणाऱ्या फसवणुकीपासून सावध–सध्या मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या 'डिजिटल अरेस्ट' आणि बनावट सरकारी अधिकाऱ्यांच्या फोनबाबत मार्गदर्शन करताना, सरकारी यंत्रणा किंवा पोलीस कधीही व्हिडिओ कॉलद्वारे 'डिजिटल अरेस्ट' करून पैशांची मागणी करत नाहीत, असे स्पष्ट करण्यात आले. अशा प्रकारचे कॉल आल्यास घाबरून न जाता तत्काळ सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले.

ओटीपी, पीन, सीव्हीव्ही, पासवर्डबाबत गोपनियता बाळगा–आर्थिक व्यवहार करताना ओटीपी, युपीआय आणि एटीएम पीन, सीव्हीव्ही, पासवर्ड कोणाशीही शेअर करू नये, असे सांगण्यात आले. तसेच पैसे प्राप्त करण्यासाठी युपीआय पीन किंवा क्यूआर कोडची आवश्यकता नसते, याबाबतही उपस्थितांना माहिती देण्यात आली.

### राष्ट्रीय आरोग्य अभियानातील पदभरती समित्यांची पुनर्रचना

**मुंबई :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्य शासन दरवर्षी प्रकल्प अंमलबजावणी आराखडा मंजूर करते. या आराखड्यात विविध आरोग्य कार्यक्रमांतील पदांना मंजुरी दिली जाते. यापूर्वी जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील एकाच समितीमार्फत पदभरती केली जात होती. जिल्हा शल्य चिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या अधिनस्त पदांच्या भरतीसाठी परस्पर अधिकारी सदस्य सचिव असल्याने स्थानिक स्तरावर अडचणी निर्माण होत असल्यामुळे या समित्यांची पुनर्रचना करण्यात आली असून नुकतेच शासनाने यासाठी परिपत्रक जारी केले आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या अधिनस्त पदांच्या भरती समितीचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी, तर सदस्य सचिव जिल्हा आरोग्य अधिकारी असतील. माता व बाल संगोपन अधिकारी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक आणि संबंधित कार्यक्रमाचे प्रतिनिधी किंवा विषयतज्ज्ञ हे सदस्य असतील. जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या अधिनस्त पदांच्या समितीचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सदस्य सचिव जिल्हा शल्य चिकित्सक असतील. निवासी वैद्यकीय अधिकारी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक आणि संबंधित कार्यक्रमाचे प्रतिनिधी किंवा विषयतज्ज्ञ यांचा सदस्य म्हणून समावेश असेल. महानगरपालिकास्तरीय समितीचे अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त आणि सदस्य सचिव वैद्यकीय आरोग्य अधिकारी असतील. माता व बाल संगोपन अधिकारी, शहर कार्यक्रम व्यवस्थापक तसेच संबंधित कार्यक्रमाचे प्रतिनिधी किंवा विषयतज्ज्ञ हे सदस्य असतील. नगरपालिकास्तरीय समितीत मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्ष, तालुका आरोग्य अधिकारी सदस्य सचिव, तर जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा प्रशासकीय अधिकारी (नगरपालिका), मुख्याधिकारी आणि जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक हे सदस्य असतील.

# जिल्हा बँक सर्वसामान्यांच्या हातात यावी, हाच प्रयत्न : खासदार निलेश लंके!

## डॉ. विश्वासराव आरोटे यांची खासदार निलेश लंके यांच्याशी सदिच्छा भेट; जिल्हा बँकेच्या भवितव्यावर चर्चा!

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या पदाधिकाऱ्यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी जिल्हा बँकेची निवडणूक, उमेदवारी अर्जांवरील माघारीनंतरचे राजकीय चित्र आणि बँकेच्या भविष्यातील वाटचालीबाबत चर्चा झाली. निमित्त जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे असले, तरी चर्चा केवळ विकासात्मक असली पाहिजे. माघारीनंतरच निवडणुकीचे खरे चित्र स्पष्ट होईल, अशी भूमिका खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केली.







खासदार लंके म्हणाले की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही केवळ घराणेशाहीच्या राजकारणाचा विषय नसून, या बँकेला आजपर्यंत मिळालेला आशिया खंडातील प्रथम क्रमांकाचा दर्जा ही अभिमानाची बाब आहे. हा लौकिक कायम ठेवत बँक सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी, छोटे उद्योजक आणि जनतेच्या हितासाठी अधिक सक्षमपणे काम करणारी संस्था व्हावी, यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. बँक सर्वसामान्य जनतेच्या हातात आणि त्यांच्या हितासाठी कार्यरत राहावी, हाच आपला प्रयत्न आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. आगामी काळात विकासाच्या मुद्द्यांना प्राधान्य देऊन सहकार क्षेत्र अधिक मजबूत करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते खासदार निलेश लंके यांचा शाल, पुष्पगुच्छ, साईबाबांची मूर्ती आणि घड्याळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर खासदार लंके यांनीही विठुरायाची मूर्ती देऊन डॉ. विश्वासराव आरोटे यांचा सत्कार केला. यावेळी दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, पारनेरचे दैनिक गांवकरी प्रतिनिधी विनोद गायकवाड आदी उपस्थित होते.

# नजिक चिंचोली येथील जगदंबा खडेश्वरीदेवी मंदिरात नवरात्रौत्सवाची जय्यत तयारी

## ज्ञानेश्वरी पारायण व हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुक्यातील नजीक चिंचोली येथील जगदंबा श्री खडेश्वरी देवी मंदिरात दि.११ ऑक्टोबर पासून नवरात्र महोत्सव, अखंड हरिनाम व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून नवरात्र उत्सवाची जय्यत तयारी येथे सुरू आहे नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंदिराचे प्रमुख महंत श्री गणेशानंद महाराज यांनी दिली.



दरवर्षी नवरात्रामध्ये मोठा उत्सव हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून येथे होत असतो. माहूरची रेणुका देवी व त्या शेजारीच तुळजापूरची तुळजाभवानी असे दोन शक्तीपीठे एकत्रित असलेले हे एकमेव शक्तीपीठ आहे.नवरात्र उत्सव काळात येथे दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, ७ ते १०.३० पारायण, सकाळी १०.३० ते ११ महाआरती, दुपारी ११ ते १२ फराळ सायंकाळी ५.३० ते ६ महाआरती, सायंकाळी ६.३० ते ८.३० कीर्तन व त्यानंतर फराळ व नंतर जागर असे कार्यक्रम होणार असल्याचे महंत गणेशानंद महाराज यांनी सांगितले

दि. ११ ऑक्टोबर रोजी विजय महाराज खेडकर (लिंबेजळगाव),दि.१२ रोजी अभयानंदगीरी महाराज (वेरुळ),दि.१३ रोजी युवराज देशमुख (आळंदी), दि.१४ रोजी भगवान महाराज जंगले (गोणेगाव), दि.१५ रोजी महंत देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री (नेवासा), दि.१६ रोजी स्वामी प्रकाशानंदगीरी महाराज (देवगड),दि.१७ रोजी ज्ञानेश्वर महाराज हजारे (पिचडगाव) दि. १८ रोजी बाळकृष्ण महाराज दिघे (गंगापूर), दि. १९ रोजी पुंडलिक महाराज जंगले (डोंगरगण) यांची कीर्तने होणार आहे

शनिवार दि.१७ ऑक्टोबर रोजी सातव्या माळेला जगदंबा खडेश्वरीदेवीचा यात्रा महोत्सव साजरा होणार असून गावातील व परिसरातील गुणीजन मंडळींचे भजन होईल, दुपारी १ ते ३ न्यू इंग्लिश स्कुल गेवराई यांचा दांडीया नृत्याचा कार्यक्रम होईल. सायंकाळी ६ ते ७ छबिना मिरवणूक होईल.दि.२० ऑक्टोबर रोजी सकाळी सोहळा संयोजक हभप गणेशानंद महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने नवरात्र उत्सवाची सांगता होणार असून अन्नदाते शिवाजी पाठक, मेजर रामचंद्र पाठक, बाळासाहेब पाठक यांचेकडून महाप्रसादाची पंगत देण्यात येणार आहे तरी भाविकांनी नवरात्र उत्सवात होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन महंत श्री गणेशानंद महाराज यांनी केले आहे.

# अतिक्रमण हटवताना बीड रोडवरील आष्टेकर सॅन्क्स हॉटेल संचालकांने नगरपरिषद कर्मचाऱ्याला दगडाने केली मारहाण

## तिघांविरुद्ध जामखेड पोलिसांत गुन्हा

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

जामखेड शहरातील बीड रोड परिसरात अतिक्रमण हटाव कारवाई सुरू असताना नगरपरिषद कर्मचाऱ्याला दगड मारून जखमी केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजय आष्टेकर, त्यांची पत्नी तसेच दत्तात्रय आष्टेकर (पूर्ण नाव माहीत नाही) अशी आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि. ६ ऑक्टोबर) दुपारी साडेएक वाजण्याच्या सुमारास बीड रोडवरील आष्टेकर सॅन्क्स हॉटेल परिसरात ही घटना घडली. मा. उच्च न्यायालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या आदेशानुसार व जामखेड नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण हटाव कारवाई सुरू होती.फिर्यादी संभाजी अजिनाथ डोके (वय ३०, रा. भुतवडा, ता. जामखेड) हे सहकाऱ्यांसह अतिक्रमण काढण्याचे काम करत असताना आरोपी क्रमांक १ व २ हे हॉटेलच्या स्लॅबवर उभे राहून दगड मारल्याने फिर्यादी जखमी झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच आरोपी क्रमांक ३ याने शिवीगाळ करून फिर्यादीची गचांडी धरत लाथाबुक्क्यांनी मारहाण करून खाली पाडले.याशिवाय, सरकारी कामात अडथळा आणून फिर्यादी व त्यांच्या सहकाऱ्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे.

**अतिक्रमण कारवाईत अडथळा आणून शिवीगाळ, लाथाबुक्क्यांनी मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप**




या प्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ६८२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १३२, १२१(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार एस. डी. लोखंडे हे पुढील तपास करीत असून, अद्याप आरोपींना अटक करण्यात आलेली नाही.

# जामन्या वन्यजीव क्षेत्रात युरोपियन निळकंठाची पक्षाची नोंद !

**रावेर (समर्थ गांवकरी)**

वन्यजीव सप्ताहानिमित्त दि. ४ ऑक्टोबर रोजी अतिसंवेदनशील जामन्या वन्यजीव क्षेत्रात पक्षी निरीक्षण, पक्षी अभ्यास व निसर्गभ्रमंतीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमादरम्यान तब्बल ४० स्थानिक तसेच स्थलांतरित पक्ष्यांची नोंद करण्यात आली. त्यात युरोपियन निळकंठ

या आकर्षक स्थलांतरित पक्ष्याचे दर्शन विशेष लक्षवेधी ठरले.

हा मध्यम आकाराचा, आकर्षक पक्षी असून शरीराचा मोठा भाग निळसर–हिरवट; पाठीकडे तपकिरी–तांबूस छटा आणि उड्डाण करताना निळ्या पंखांची झळाळी स्पष्ट दिसते.मोकळी वनक्षेत्रे, झुडपी प्रदेश, गवताळ भाग आणि विखुरलेली झाडे असलेले परिसर त्याला अनुकूल असतात.

साधारणपणे झाडांच्या ढोलीत घरटे करतो. नोव्हेंबर नंतर हा पक्षी स्थलांतरीत होण्याची शक्यता असते.

यासोबतच निसर्गभ्रमंतीदरम्यान लांडगा, कोल्हा आणि बिबट्याच्या विष्ठेचे पुरावे आढळून आले आहेत. त्यामुळे जामन्या वन्यजीव क्षेत्रात विविध वन्यजीवांचा वावर असून, हे क्षेत्र जैवविविधतेने समृद्ध असल्याचे अधोरेखित झाले.

चातक निसर्ग संवर्धन संस्था आणि जामन्या वन्यजीव क्षेत्र यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. पक्षीतज्ज्ञ अनिल महाजन, तुषार पाटील व योगेश पाटील यांनी उपस्थितांना पक्ष्यांची ओळख, अधिवास, वर्तन व पक्षी निरीक्षणाच्या पद्धतींबाबत मार्गदर्शन केले.

हा उपक्रम उपवनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक श्री. कृष्णा भवर आणि सहाय्यक वनसंरक्षक श्री. सत्यजित निकत यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन वनपरिक्षेत्र अधिकारी रूपेशकुमार दुसाने, जामन्या वन्यजीव यांनी केले.

यावेळी जामन्या वन्यजीव क्षेत्रातील वनपरिमंडळ अधिकारी, वनरक्षक व संरक्षण मजूर उपस्थित होते. त्यांनी पक्ष्यांचे अधिवास, विविध प्रजातींची ओळख, निरीक्षण पद्धती आणि वन्यजीव संवर्धनाबाबत माहिती जाणून घेतली.

**वन्यजीव सप्ताहात ४० स्थानिक व स्थलांतरित पक्ष्यांची नोंद; लांडगा, कोल्हा व बिबट्याच्या विष्ठेचेही पुरावे**

अतिसंवेदनशील जामन्या वनक्षेत्रात एकाच उपक्रमातून पक्ष्यांच्या ४० प्रजातींची नोंद आणि विविध वन्यजीवांच्या अस्तित्वाचे पुरावे मिळणे, येथील समृद्ध वन परिसंस्थेचे महत्त्व अधोरेखित करणारे ठरले आहे.

**प्रतिक्रिया**

अतिसंवेदनशील जामन्या वन्यजीव क्षेत्रात वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने झालेल्या पक्षी निरीक्षणात ४० स्थानिक व स्थलांतरित पक्ष्यांची नोंद होणे ही येथील समृद्ध जैवविविधतेची महत्त्वपूर्ण नोंद आहे. युरोपियन निळकंठासारख्या



स्थलांतरित पक्ष्याचे दर्शन तसेच लांडगा, कोल्हा आणि बिबट्याच्या अस्तित्वाचे पुरावे आढळणे, या वनक्षेत्रातील समृद्ध वन परिसंस्थेचे महत्त्व अधोरेखित करते. पक्षी व वन्यजीवांच्या अधिवासाचे संरक्षण करण्यासाठी वन विभागाच्या वतीने सातत्याने प्रयत्न केले जात असून, नागरिकांनीही वन्यजीव संवर्धनात सहकार्य करावे.

**– रूपेशकुमार दुसाने, वनक्षेत्रपाल, जामन्या वन्यजीव क्षेत्र.**

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



## थोडक्यात पण महत्त्वाचे

### डोंगरगावच्या ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व सौ. भागुबाई उगले यांचे निधन!

**अकोले** (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील डोंगरगाव येथील जुन्या पिढीतील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व सौ. भागुबाई कारभारी उगले यांचे बुधवारी सकाळी वृद्धापकाळाने वयाच्या ८५व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने उगले कुटुंबासह डोंगरगाव परिसरात शोककळा पसरली असून, ग्राम स्थांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. सौ. भागुबाई उगले यांच्या पश्चात पती, दोन मुले, चार मुली, सुना, नातवंडे व पतवंडे असा मोठा परिवार आहे. डोंगरगावचे माजी उपसरपंच तथा पत्रकार अशोक उगले, प्रगतिशील शेतकरी सोमनाथ उगले, सौ. अलका लहानू फटांगरे, सौ.प्रतिभा दिलीप लांडगे, सौ. बेबी बाळासाहेब सहाणे व मीना कारभारी उगले यांच्या त्या मातोश्री होत. सौ. भागुबाई उगले यांच्या पार्थिवावर डोंगरगाव येथे आढळातीरी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या निधनाने उगले परिवाराने कुटुंबातील ज्येष्ठ आधारवड गमावल्याची भावना व्यक्त होत आहे.



### कामाठीपुरा पुनर्विकास प्रकल्प राज्यासाठी आदर्श ठरेल अशा पद्धतीने राबवावा

#### राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर




**मुंबई :** कामाठीपुरा पुनर्विकास प्रकल्प गृहनिर्माण क्षेत्रात राज्याला दिशादर्शक आणि आदर्श ठरेल अशा पद्धतीने राबवावा. हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कामाठीपुरा विकास समितीच्या काही पदाधिकाऱ्यांचा समावेश असलेली समिती गठित करावी, असे निर्देश गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले. कामाठीपुरा विकास समितीच्या मागण्यांबाबत मंत्रालयात आयोजित बैठकीत राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी आढावा घेतला. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासन सर्व आवश्यक कार्यवाही करेल. विकास समितीच्या सर्व मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून त्या पूर्ण करण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले, पुनर्विकास प्रकल्पामध्ये येथील नागरिकांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी शासन सकारात्मक आहे. प्रकल्पाला पुढे नेण्यासाठी समितीने शासनासोबत सम न्वयाने काम करावे. कायदे, नियमात जे बसेल तशा पद्धतीने सर्व मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. यावेळी खासदार अरविंद सावंत, खासदार मिलिंद देवरा, आमदार अमीन पटेल, गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद शंभरकर तसेच कामाठीपुरा विकास समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### राष्ट्रीय आरोग्य अभियानातील तज्ज्ञांसाठी कामगिरीआधारित मानधनाची सुधारित रचना

**मुंबई :** केंद्र शासनाने २०२२ मध्ये सुधारित भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके (आयपीएचएस) जारी केली आहेत. त्यानुसार तज्ज्ञांच्या कामगिरीचे निकष, आरोग्य संस्थांमधील त्यांची उपलब्धता व उपयोग आणि अंम लबजावणीतील अडचणी विचारात घेऊन राष्ट्रीय आरोग्य अभियानाने राष्ट्रीय आरोग्य अभियानातील तज्ज्ञांसाठी काम गिरीआधारित मानधनाची सुधारित रचना निश्चित केली आहे. सुधारित रचनेनुसार पूर्णवेळ स्त्रीरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, शल्यचिकित्सक, अस्थिरोगतज्ज्ञ, कान–नाक–घसा शल्यचिकित्सक आणि फिजिशियन यांना नॉन–टीएसपी क्षेत्रात एक लाख रुपये, तर टीएसपी क्षेत्रात एक लाख १५ हजार रुपये निश्चित मासिक मानधन मिळेल. निर्धारित कामगिरीनुसार निश्चित आणि कामगिरीआधारित मानधन मिळून या तज्ज्ञांचे एकूण मासिक मानधन कमाल तीन लाख ५० हजार रुपयांपर्यंत राहील. यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातील कार्यरत आणि सेवानिवृत्त तज्ज्ञांच्या बैठकीतून क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून अभिप्राय घेण्यात आला. यापूर्वी या विषयावर जारी केलेल्या सर्व मार्गदर्शक सूचना रद्द करण्यात आल्या आहेत. पूर्णवेळ हृदयरोगतज्ज्ञांसाठी नॉन–टीएसपी क्षेत्रात दोन लाख ५० हजार रुपये आणि टीएसपी क्षेत्रात दोन लाख ७५ हजार रुपये निश्चित मासिक मानधन राहील. कामगिरीआधारित रकमेसह त्यांना अनुक्रमे कमाल चार लाख ५० हजार आणि चार लाख ७५ हजार रुपये मासिक मानधन मिळू शकेल. पूर्णवेळ विकृतीशास्त्रज्ञांना नॉन–टीएसपी क्षेत्रात ८० हजार आणि टीएसपी क्षेत्रात एक लाख रुपये, अर्धवेळ सूक्ष्मजीवशास्त्रज्ञांना अनुक्रमे ४० हजार व ५० हजार रुपये, तर पूर्णवेळ मूत्रपिंडविकारतज्ज्ञांना दोन्ही क्षेत्रांत एक लाख २५ हजार रुपये मानधन निश्चित केले आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या विविध योजनांतील प्रथम संदर्भ सेवा केंद्रे (एफआरयू) आणि इतर रुग्णालयांमध्ये नव्याने नियुक्त किंवा पुनर्नियुक्त होणाऱ्या तज्ज्ञांना १ ऑक्टोबर २०२६ पासून सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार मानधन द्यावे, असे निर्देश आयुक्त आरोग्य सेवा आयुक्त तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान संजय काटकर यांनी सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांना दिले आहेत.

# 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत ठाणे जिल्ह्यात आरोग्यसेवेचा व्यापक जागर

**ठाणे** (समर्थ गांवकरी)

'सेवा संकल्प अभियान'च्या माध्यमातून आरोग्यसेवा केवळ रुग्णालयाच्या चार भिंतींपुरती मर्यादित न ठेवता ती थेट नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचविण्याचा व्यापक प्रयत्न ठाणे जिल्ह्यात करण्यात येत आहे. आरोग्य तपासणी, आजारांचे लवकर निदान, प्रतिबंधात्मक आरोग्य, मानसिक आरोग्य, पोषण, महिला व किशोरवयीन आरोग्य तसेच निरोगी जीवनशैलीबाबत जनजागृती अशा विविध अंगांनी दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत जिल्ह्यात ४४८ विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करून तब्बल २९ हजार १२८ नागरिकांना विविध आरोग्यसेवा व जनजागृती उपक्रम ांचा लाभ देण्यात आला आहे.

ठाणे जिल्ह्यात हे अभियान जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत केवळ आजारांवरील उपचारांवर भर न देता आजार होण्यापूर्वीच त्यांचा प्रतिबंध, नियमित आरोग्य तपासणी आणि नागरिकांमध्ये आरोग्यदायी जीवनशैलीची सवय निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

यामध्ये आरोग्य तपासणी शिबिरे, योग व ध्यान सत्रे, महिलांचे आरोग्य व स्वच्छता शिबिरे, अवयवदान संकल्प अभियान, पोषण व ॲनिमिया जनजागृती, आयुष्मान भारत कार्ड वाटप, किशोरवयीन मुला–मुलींसाठी क्षमता बांधणी उपक्रम, ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष आरोग्य शिबिरे, मोतीबिंदू तपासणी, मानसिक आरोग्य स्क्रीनिंग व समुपदेशन, निरोगी जीवनशैलीविषयक जनजागृती, व्यसनमुक्ती जनजागृती व समुपदेशन आदी उपक्रमांचा समावेश आहे.

अभियानाच्या माध्यमातून जिल्हा परिषद ठाणे येथे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. तसेच आतापर्यंत आरोग्य तपासणीची ५१ शिबिरे, पोषण व ॲनिमिया जनजागृतीची ५१ शिबिरे, महिलांचे आरोग्य व स्वच्छतेची ५५ शिबिरे, योग व ध्यानाची ४५ सत्रे, मानसिक आरोग्य स्क्रीनिंग व समुपदेशनाची २१ शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत.

याशिवाय किशोरवयीन मुला–मुलींसाठी २२ उपक्रम, ज्येष्ठ नागरिकांसाठी २२ विशेष आरोग्य शिबिरे, मोतीबिंदू तपासणीची १० शिबिरे आणि निरोगी जीवनशैलीविषयक १३ जनजागृती उपक्रम राबविण्यात आले आहेत.

**४४८ आरोग्य शिबिरांमधून २९ हजारांहून अधिक नागरिकांना लाभ**

**आरोग्य तपासणीसोबतच मानसिक आरोग्य, पोषण, महिला आरोग्य, असंसर्गजन्य आजार व व्यसनमुक्ती जनजागृतीवर विशेष भर**

असंसर्गजन्य आजारांच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी छउऊ तपासणीची ७ शिबिरे घेण्यात आली असून, छउऊ संदर्भातील रुग्णांच्या पाठपुराव्यासाठी १३ उपक्रम राबविण्यात आले आहेत. तसेच अवयवदान संकल्प अभियानांतर्गत १६ उपक्रम घेऊन नागरिकांम ध्ये अवयवदानाबाबत जनजागृती करण्यात आली आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत दुर्बल व आजारग्रस्त बालकांचा शोध घेऊन आवश्यक तपासणी व संदर्भसेवा उपलब्ध करून देण्याचे कामही करण्यात येत आहे. 'सेवा संकल्प अभियान'च्या माध्यमातून नागरिकांना नियमित आरोग्य तपासणी, संतुलित आहार, व्यायाम व योग, मानसिक आरोग्याची काळजी, व्यसनांपासून दूर राहणे आणि निरोगी जीवनशैलीचा अवलंब करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. विशेषतः मधुमेह, उच्च रक्तदाब व इतर असंसर्गजन्य आजारांचे वेळीच निदान होण्यासाठी नागरिकांना आवश्यक तपासणी करून घेण्याबाबत प्रोत्साहित केले जात आहे.

आरोग्यसेवा ही केवळ उपचारापुरती मर्यादित न राहता नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करून प्रतिबंधात्मक आरोग्याची चळवळ अधिक व्यापक करण्याचे माध्यम म्हणून 'सेवा संकल्प अभियान' कार्यरत आहे. या अभियानाच्या माध्यमातून आरोग्य विभागाच्या विविध सेवा आणि जनजागृती उपक्रमांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.




# ग्रामीण मातीतून अभिनय क्षेत्रात भरारी

**श्रीगोंदा** (समर्थ गांवकरी)

'पुत्र हो ऐसा गुंडा, त्याचा लागो तिन्ही लोकी झेंडा,' असे संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे. आपल्या कर्तृत्वाने गावाचे, तालुक्याचे आणि आपल्या मातीचे नाव उज्ज्वल करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत ही उक्ती सार्थ ठरते. श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण येथील खेडकेवाडीच्या मातीतून आलेले आणि सध्या अभिनय क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे डॉ. बाळासाहेब खेंडके यांनी 'सावित्रीबाई ज्योतिराव फुले' या मालिकेत इंग्रज अधिकाऱ्याची भूमिका साकारत श्रीगोंदा तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

ग्रामीण भागात शालेय शिक्षण घेत असतानाच कलेची आवड जोपासणाऱ्या डॉ. खेंडके यांनी अभिनयासोबतच लावणी, नृत्य आणि मॉडेलिंग या विविध कलाक्षेत्रांतही आपली ओळख निर्माण केली. त्याचबरोबर त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय सेवेतही योगदान दिले आहे. शिक्षण, वैद्यकीय सेवा आणि कला अशा विविध क्षेत्रांचा समतोल साधत त्यांचा प्रेरणादायी प्रवास सुरू आहे.

**डॉ. बाळासाहेब खेंडके यांची 'सावित्रीबाई ज्योतिराव फुले' मालिकेत इंग्रज अधिकाऱ्याची भूमिका**

अभिनय क्षेत्रात काम करताना त्यांनी यापूर्वीही विविध मालिका आणि चित्रपटांम ध्ये इंग्रज अधिकाऱ्यांच्या भूमिका साकारल्या आहेत. त्यांच्या अभिनयातील सहजता, व्यक्तिमत्त्व आणि भूमिकेला साजेशी देहबोली यामुळे त्यांना या प्रकारच्या ऐतिहासिक भूमिकांसाठी संधी मिळत गेली.

आता 'सावित्रीबाई ज्योतिराव फुले' या मालिकेत अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांच्यासोबत काम करण्याची संधी डॉ. बाळासाहेब खेंडके यांना मिळाली आहे. या संधीचे ते निश्चितच सोने करतील, असा विश्वास त्यांच्या चाहत्यांसह श्रीगोंदा तालुक्यातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

मांडवगणच्या ग्रामीण मातीत जन्म घेऊन श्रीगोंद्यात शिक्षण घेत, कलेची साधना करत आणि वैद्यकीय क्षेत्रात सेवा बजावत अभिनयाच्या मोठ्या पडद्यावर व छोट्या पडद्यावर आपले स्थान निर्माण करणारा डॉ. खेंडके यांचा प्रवास निश्चितच नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. ग्रामीण भागातील प्रतिभेला योग्य संधी मिळाल्यास ती राज्याच्या आणि देशाच्या पातळीवर आपली स्वतंत्र ओळख निर्माण करू शकते, याचे डॉ. खेंडके हे उत्तम उदाहरण ठरत आहेत.

'सावित्रीबाई ज्योतिराव फुले' मालिकेतील त्यांच्या भूमिकेसाठी श्रीगोंदा तालुक्याच्या वतीने डॉ. बाळासाहेब खेंडके यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या पुढील कलाप्रवासासाठी शुभेच्छा व्यक्त होत आहेत.



# नवोदित मतदार नोंदणीला प्राधान्य द्या : उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे



**राहुरी** (समर्थ गांवकरी)

लोकशाही व्यवस्थेत युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे एक ऑक्टोबर २०२६ रोजी १८ वर्षे पूर्ण केलेल्या पात्र युवक युवतींना मतदार म्हणून नोंदणी करून घ्यावी असे आव्हान अहिल्यानगरचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी मा.सुनील गाढे यांनी केले.

राहुरी येथील लोकनेते राम दास पाटील धुमाळ महाविद्यालयात आयोजित मतदार नोंदणी मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते नवोदित मतदारांची नोंदणी प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व म हाविद्यालयांनी पुढाकार घ्यावा असे त्यांनी सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीची पात्रता आवश्यक कागदपत्रे अर्ज भरण्याची प्रक्रिया आणि म तदार यादीतील नावाची पडताळणी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले पात्र विद्यार्थ्यांचे प्रातिनिधीक स्वरूपात नमुना क्रमांक सहा भरून घेत मतदार नोंदणीचा औपचारिक प्रारंभ करण्यात आला विशेष म्हणजे उपजिल्हा निवडणूक अधिकारी हे याच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत त्यामुळे माजी विद्यार्थी म्हणून महाविद्यालयात अधिकारी म्हणून परत येऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचा विशेष अनुभव आला असे त्यांनी सांगितले महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी वेळेत पूर्ण करण्यासाठी महाविद्यालय प्रशासन प्राध्यापक विद्यार्थी प्रतिनिधी आणि निवडणूक यंत्रणेने समन्वयाने काम करावे असे राहुरीचे तहसीलदार डॉ. अमित पवार यांनी आव्हान केले आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. एन आर दळवी पुढे म्हणाले की आजचा तरुण उद्याचा देशाचा जबाबदार नागरिक होणार आहे त्यांच्याच हातात देशाचे नेतृत्व जाणार आहेत त्यामुळे कटाक्षाने सर्व अठरा वर्षे पूर्ण झालेल्या युवक युवतींनी नवीन म तदार नोंदणीची प्रक्रिया जबाबदारीने पूर्ण करावी असे सांगितले तसेच नायब तहसीलदार विशाल सदनापूर अनिल बडे प्राध्यापक अनिरुद्ध जाधव आणि महसूल कर्मचारी आणि अभिजीत गायकवाड यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार

# विद्यार्थ्यांच्या वैचारिक जडणघडणीतील महत्त्वाचा टप्पा म्हणजे शासकीय रेखाकला परीक्षा

**श्रीगोंदा** (समर्थ गांवकरी)

विद्यार्थ्यांच्या अंगातील कलात्मक दृष्टिकोन आणि विचारांचा योग्य आरसा म्हणजे त्यांनी तयार केलेली कलाकृती! याच कलागुणांना वाव देणारी 'शासकीय रेखाकला परीक्षा' श्रीगोंदा येथील महादजी शिंदे विद्यालय येथे २८ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

शासकीय रेखाकला परीक्षा हे विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कौशल्याला आणि सुप्त गुणांना मिळालेले एक उत्तम व्यासपीठ आहे. रंग, रेषा आणि आकार यांच्याशी



खेळता खेळता विद्यार्थ्यांनी या परीक्षेत अनेक सुंदर व कल्पक रचना साकारल्या. परीक्षा कक्षात विद्यार्थ्यांनी रेखाटलेली चित्रे त्यांच्यातील उपजत कला कौशल्याची साक्ष देत होती. या परीक्षांचे महत्त्व शालेय जीवनात अनन्यसाधारण आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि एकाग्रतेला चालना मिळते.

परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाचे कलाशिक्षक व अहिल्यानगर जिल्हा कला अध्यापक संघाचे उपाध्यक्ष श्री. शरद शिरसाट आणि कलाशिक्षक श्री. कल्याण उल्हारे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच परीक्षा कामकाज यशस्वी पार पाडण्यासाठी श्री विकास लोखंडे, श्री. हर्षवर्धन आगळे, श्री. विकास दराडे व श्री. लालकृष्ण मुळे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकांनी उत्तम सहकार्य केले.

चार दिवस चाललेल्या या परीक्षेत विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

# रणजीतसिंह देशमुख यांची जिल्हा बँकेवर संचालकपदी बिनविरोध निवड

**संगमनेर** (समर्थ गांवकरी)

आशिया खंडात अग्रगण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदी राजहंस दूध संघाचे माजी चेअरमन रणजितसिंह देशमुख यांची संगमनेर तालुका सोसायटी मतदार संघातून बिनविरोध निवड झाली आहे.

काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेने कायम शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना मोठी मदत केली आहे जिल्ह्यातील सर्व सेवा सोसायटी सभासद शेतकरी यांचा लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वावर मोठा विश्वास राहिल्याने या बँकेचा आलेख कायम उंचावत राहिला.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी अनेक वर्षे बँकेचे नेतृत्व केले. त्यांच्या पाठोपाठ लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी या बँकेला नेतृत्व दिले. यावर्षी राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्याने ही बँक शेतकऱ्यांची आहे म्हणून बिनविरोध निवडणूक व्हावी याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील सर्व पक्षीय नेत्यांची संगमनेर कारखाना कार्यस्थळावरील अमृत कुटी येथे बैठक झाली. आणि त्यानंतर बिनविरोध निवडणुकीचे वारे वाहू लागले.

संगमनेर तालुक्यातून सोसायटी मतदारसंघातून राजहंस दूध संघाचे चेअरमन व सहकारातील जाण असलेले युवा नेतृत्व रणजितसिंह देशमुख यांना उमेदवारी देण्याचा निर्णय नेतृत्वाने घेतला याचबरोबर रणजितसिंह देशमुख यांनी या निर्णयाचा आदर करून तालुक्याची ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणाऱ्या राजहंस दूध संघाच्या चेअरमन पदाचा राजीनामा दिला.

रणजीतसिंह देशमुख यांनी दूध संघाच्या माध्यमातून दूध उत्पादन वाढीबरोबरच एमडीएफ गोठे, मुरघास संकल्पना अत्यंत प्रभावीपणे राबवली आणि नुकतीच मिशन ५० लिटर हे राबविण्यात आले. महाराष्ट्र राज्य दूध महासंघाचे चेअरमनपद ही त्यांनी यापूर्वी भूषवले आहे. कोरोना संकट काळात केलेली राज्यातील दूध उत्पादकांना मदत लक्षवेधी ठरली होती. दूध संघाच्या म ाध्यमातून सहकार आणि ग्रामीण विकास यामध्ये त्यांनी मोठे काम केले असून त्यांच्या या कामाचा फायदा नक्कीच जिल्हा बँकेत होणार आहे.

सेवा सोसायटी मतदारसंघातून ते बिनविरोध निवडून आले आहेत त्याचबरोबर भटक्या विमुक्त जाती जमाती मतदार संघातून संगमनेर तालुक्यातून गणपतराव सांगळे यांना उमेदवारी दिली आहे.

रणजितसिंह देशमुख यांच्या बिनविरोध निवडीबद्दल काँग्रेस पक्षाचे नेते मा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, मा आमदार डॉ सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, सौ दुर्गाताई तांबे,युवा नेत्या डॉ. जयश्रीताई थोरात, डॉ. मैथिलीताई तांबे,बाजीराव पाटील खेम नर, पांडुरंग पाटील घुले,ड माधवराव कानवडे, सुधाकर जोशी ,शंकरराव खेम नर, इंद्रजीत भाऊ थोरात, लक्ष्मणराव कुटे, संपतराव डोंगरे ,हौशीराम सोनवणे, रामहरी कातोरे, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे सौ अर्चनाताई बालोडे, दूध संघाचे व्हा चेअरमन राजेंद्र चकोर, व सर्व संचालक मंडळ व विविध पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



**बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्यांच्या विकासासाठी काम : रणजीत सिंह देशमुख**

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श शिस्त व तत्वांवर संगमनेरच्या सहकाराची वैभवशाली वाटचाल राहिली आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संघाचे चेअरमन पद सांभाळताना दूध उत्पादकांच्या जीवनामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम केले. जिल्हा बँकेत संचालकपदी काम करण्याची संधी मिळाली आहे .या माध्यमातून तालुक्यातील व जिल्ह्यातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना जास्तीत जास्त मदत करण्याबरोबर त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी काम करू असा विश्वास नवनिर्वाचित संचालक रणजीतसिंह देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# जिल्हा बँक निवडणुकीत वैध उमेदवारांची यादी जाहीर

## जिल्हा बँक निवडणुकीचे चित्र स्पष्ट; वैध उमेदवारांची यादी जाहीर, दिग्गज मैदानात!

**दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. अहिल्यानगरच्या पंचवार्षिक निवडणूक सन २०२६-२०३१ साठी दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्रांची छाननी बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी पूर्ण झाली. छाननीअंती निवडणूक निर्णय अधिकारी तथा अहिल्यानगर जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी विविध मतदारसंघांतील वैध उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीचे चित्र आता हळूहळू स्पष्ट होऊ लागले असून, जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे लक्ष पुढील घडामोडींकडे लागले आहे.**

## अनेक दिग्गज रिंगणात!






: लेखन :
**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम, २०१४ मधील नियम २६ अन्वये वैध नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिद्ध करण्यात आली. प्राथमिक कृषी पतपुरवठा व विकास सेवा सहकारी संस्था, धान्य अधिकोष सहकारी संस्था तसेच तत्सम इतर संस्था म तदारसंघांसह विविध राखीव मतदारसंघांतील उमेदवारांचे अर्ज छाननीत वैध ठरले आहेत. तालुकानिहाय पाहता अकोले मतदारसंघात लहामटे किरण यमाजी, चौधरी शरद कारभारी, शिंदे संजीवनी गोविंद, गायकर सिताराम कोंडाजी, भोर बाळासाहेब दत्तात्रय, वाकचौरे रावसाहेब राम राव, वाकचौरे कैलास भास्कर, पिचड वैभव मधुकर, शेटे विकासराव कचरू, नवले मधुकर लक्ष्मण, बांडे चंदर भाऊ आदींचे अर्ज वैध ठरले आहेत. जामखेडमध्ये घुमरे सचिन नवनाथ, राळेभात अमोल जगन्नाथ व राळेभात सुधीर जगन्नाथ, तर कर्जत मतदारसंघात पिसाळ तुषार अंबादास, पिसाळ अंबादास शंकरराव, देशमुख देविदास विजयराव, जगताप मंगेश रावसाहेब, गुंड मंजुषा राजेंद्र, शिंदे ज्योती प्रकाश, साळुंके सुरेश भागवत, पाटील किरण आण्णासाहेब, तापकिर काकासाहेब लक्ष्मण व शेवाळे कैलास शंकरराव यांचा समावेश आहे.

कोपरगाव मतदारसंघात कोल्हे बिपीनदादा शंकरराव व कोल्हे विवेक बिपीनदादा, अहिल्यानगर तालुक्यात हराळ बाळासाहेब रघुनाथ, शेळके प्रताप गंगाधर व कडिले अक्षय शिवाजीराव, नेवासा येथे गडाख शंकरराव यशवंतराव, पारनेरमध्ये शेळके गितांजली उदय, दाते काशिनाथ महादू, लंके निलेश ज्ञानदेव व शिंदे राहुल प्रकाशराव यांचे अर्ज वैध ठरले आहेत. पाथर्डीमध्ये राजळे मोनिका राजीव, शेटे कडुचंद भानुदास व ढाकणे ऋषिकेश प्रताप, राहाता मतदारसंघात विखे पाटील सुजय राधाकृष्ण व खडे भास्कर निवृत्ती, राहुरीमध्ये तनपुरे प्राजक्त प्रसाद, तनपुरे हर्ष अरुण व कदम सत्यजित चंद्रशेखर, तर संगमनेरमध्ये देशमुख रणजितसिंह विजयसिंह यांचे अर्ज वैध ठरले आहेत.

शेवगाव मतदारसंघात घुले चंद्रशेखर मारूतराव व घुले राजश्री चंद्रशेखर, श्रीगोंदा मतदारसंघात जगताप राहुल कुंडलिकराव, नागवडे राजेंद्र शिवाजीराव, पानसरे अर्चना दत्तात्रय, पानसरे दत्तात्रय भाऊसाहेब, जगताप प्रणोती राहुल, शेलार आण्णासाहेब सिताराम, पाचपुते प्रतापसिंह बबनराव, नलगे सुधीर लक्ष्मण, जगताप अनुराधा कुंडलिकराव व महांडुळे संध्या महेश यांचे अर्ज वैध ठरले आहेत.

## जिल्हा बँकेच्या रणांगणात दिग्गजांची एंट्री; वैध उमेदवारांची यादी जाहीर!

श्रीरामपूर मतदारसंघात ससाणे करण जयंतराव, शिंदे सोन्याबापू गोविंद, बनकर रणजित दिलीपराव व राऊत सोपानराव पुंजाजी हे उमेदवार निवडणूक रिंगणात राहिले आहेत.

राखीव मतदारसंघातही चुरस:

जिल्हा बँकेच्या महिला राखीव मतदारसंघासाठी दाखल झालेल्या अर्जांचीही छाननी पूर्ण झाली असून गुंड मंजुषा राजेंद्र, गणे चंदा गंगाधर, नागवडे अनुराधाताई राजेंद्र, लहामगे सुवर्णा आनंदा, शिंदे संजीवनी गोविंद, गायकवाड सोनल प्रशांत, सोलेपाटील जयमाला भारत, नवले रेखा शिवाजी, लोटके शैलजा सुनिल, वाघ संगिता जयंत, देशमुख अश्विनी विक्रम, वाकचौरे शारदा दौलत, काळे विद्या विनायक, लुणिया रुपाली अभिजीत, गोलेकर ज्योती शिरीष, पानसरे अर्चना दत्तात्रय, जगताप प्रणोती राहुल, पाचपुते प्रतिभा बबनराव व काकडे हर्षदा विद्याधर आदी उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत.

याशिवाय अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग तसेच वि.जा.भ.ज./वि.मा.प्र. राखीव मतदारसंघांसाठी दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्रांचीही छाननी करण्यात आली असून संबंधित मतदारसंघांतील अनेक उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्यामुळे खुल्या मतदारसंघांसोबतच राखीव जागांवरही निवडणुकीची चुरस वाढण्याची चिन्हे आहेत.

माघारीनंतर खरे चित्र स्पष्ट होणार:

नामनिर्देशन पत्रांची छाननी पूर्ण झाल्याने आता निवडणुकीतील पुढील महत्त्वाचा टप्पा म्हणजे उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया आहे. अनेक मतदारसंघांमध्ये एकाच जागेसाठी एकापेक्षा अधिक उमेदवार रिंगणात असल्याने उमेदवारी अर्ज माघारीच्या अंतिम दिवसानंतरच प्रत्यक्ष निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. काही मतदारसंघांमध्ये संभाव्य आघाड्या, समझोते आणि बिनविरोध निवडीसाठी हालचाली होण्याची शक्यता असून, कोण माघार घेतो आणि कोण मैदानात कायम राहतो याकडे राजकीय व सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या निवडणुकीकडे:

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील महत्त्वाची संस्था असल्याने तिच्या निवडणुकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधील राजकीय समीकरणे, सहकार क्षेत्रातील गटबाजी, स्थानिक नेतृत्वाची ताकद आणि मतदारसंघनिहाय समीकरणे या निवडणुकीत निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. अनेक दिग्गज नेत्यांच्या समर्थकांनी उमेदवारी दाखल केल्याने निवडणुकीतील चुरस वाढली आहे.

दरम्यान, वैध नामनिर्देशन पत्रांची अधिकृत यादी बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता निवडणूक कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली. आता उमेदवारी अर्ज माघारीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम उमेदवारांची संख्या आणि मतदारसंघनिहाय निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार असून, त्यानंतर जिल्हा बँकेच्या सत्तासमीकरणासाठी प्रत्यक्ष राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे.

# दिव्यातील बेतवडे गाव परिसरात 'पीएम आवास'चा मार्ग मोकळा !

## ३ हजार ८४ घरे उभारणार ; ७५० कोटींची निविदा

ठाणे (समर्थ गांवकरी)

दिवा शहरारातील बेतवडेगाव येथे गेल्या काही वर्षांपासून रखडलेल्या पंतप्रधान आवास योजनेतील ३ हजार ८४ घरांच्या प्रकल्पाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. ठाणे महापालिकेने या प्रकल्पासाठी तब्बल ७५० कोटी १३ लाख रुपयांची निविदा काढली असून, महापालिकेच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे त्यामुळे परवडणाऱ्या घरांच्या प्रतीक्षेत असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील कुटुंबांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

पीपीपीऐवजी महापालिका उभारणार घरे

बेतवडे येथील दोन भूखंडांवर मिळून ३ हजार ८४ घरे उभारण्यात येणार आहेत. यापूर्वी हा प्रकल्प खासगी विकसकाच्या सहभागातून पीपीपी पद्धतीने राबविण्याचे नियोजन होते. त्यानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १ हजार ४४१ घरे प्रस्तावित होती. त्यापैकी १ हजार २५३ घरे पात्र लाभार्थ्यांना अल्पदरात, तर १८८ घरे प्रकल्पबाधितांसाठी राखीव ठेवण्याचे नियोजन होते. मात्र निविदा काढूनही अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने आणि अटी-शर्तींमध्ये बदल करूनही तोडगा न निघाल्याने पीपीपी पद्धतीचा प्रस्ताव बाजूला ठेवण्यात आला. आता महापालिका स्वतःच्या माध्यमातून हा प्रकल्प पुढे नेणार आहे.

२१ ऑक्टोबरपर्यंत निविदा

या प्रकल्पाचे बांधकाम ईपीसी पद्धतीने करण्यात येणार आहे. प्रकल्पासाठी आवश्यक निधी महापालिका उपलब्ध करून देणार असून, निविदेतून निवडल्या जाणाऱ्या खासगी कंत्राटदाराकडे अभियांत्रिकी, साहित्य खरेदी आणि प्रत्यक्ष बांधकामाची जबाबदारी राहणार आहे. ८ ऑक्टोबरला निविदापूर्व बैठक होणार असून, २१ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत ऑनलाइन निविदा सादर करता येणार आहेत. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येणार आहे.



कोणाला मिळणार लाभ ?

पंतप्रधान आवास योजनेच्या निकषांनुसार पात्र लाभार्थ्यांची निवड केली जाणार आहे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न निर्धारित मर्यादेत असणे आणि लाभार्थी अथवा त्याच्या कुटुंबाच्या नावावर देशात कुठेही पक्के घर नसणे हे प्रमुख निकष असतील. पात्र लाभार्थ्यांना केंद्र व राज्य सरकारच्या अनुदानाचा लाभ मिळणार आहे.

# जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची चुरस वाढली

## डॉ. सुजय विखे, रणजितसिंह देशमुख, शंकरराव गडाख बिनविरोध

संगमनेर (समर्थ गांवकरी)

**संगमनेर अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत आज महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या. राहाता सोसायटी मतदारसंघातून माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, संगमनेर सोसायटी मतदारसंघातून रणजितसिंह देशमुख आणि नेवासा मतदारसंघातून माजी मंत्री शंकरराव गडाख यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याच्या हालचालींना वेग आला असून, आता सर्वांचे लक्ष अध्यक्षपदाच्या सम ीकरणांकडे लागले आहे.**




राहाता सोसायटी मतदारसंघात डॉ. सुजय विखे पाटील यांच्या विरोधात एकनाथ घोगरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. घोगरे यांच्या अर्जावरील सूचकाच्या स्वाक्षरीबाबत डॉ. विखे यांच्या वतीने आक्षेप घेण्यात आला होता. स्वाक्षरी बनावट असल्याचा दावा अहमदनगर जिल्हा सहकारी बँक पुराव्यानिशी करण्यात आला. छाननीदरम्यान हा आक्षेप ग्राह्य धरला गेल्याने घोगरे यांचा अर्ज बाद झाला आणि डॉ. सुजय विखे पाटील यांची बिनविरोध निवड झाली. संगमनेर सोसायटी मतदारसंघात माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे जावई रणजितसिंह देशमुख यांच्या विरोधात चित्रा गायकवाड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. या अर्जावरील अनुम ोदकाच्या स्वाक्षरीबाबत देशमुख यांच्या वतीने आक्षेप घेण्यात आला. संबंधित अनुमोदकाने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसम ोर प्रत्यक्ष उपस्थित राहून ती स्वाक्षरी आपली नसल्याचे सांगितल्याचा दावा करण्यात आला. या प्रकरणावर झालेल्या सुनावणीनंतर चित्रा गायकवाड यांचा अर्ज बाद करण्यात आला. त्यामुळे रणजितसिंह देशमुख यांची बिनविरोध निवड झाली.

दरम्यान, नेवासा मतदारसंघातून माजी मंत्री शंकरराव गडाख हेही बिनविरोध संचालक झाले आहेत. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीत आतापर्यंत तीन प्रमुख राजकीय नेत्यांचे संचालकपद निश्चित झाले आहे.

जिल्ह्याच्या राजकारणात विखे आणि थोरात हे पारंपरिक राजकीय विरोधक मानले जातात. मात्र, जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने सहकार क्षेत्रात दोन्ही गट एकत्र आल्याचे चित्र आहे. बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विखे, थोरात आणि गडाख यांच्या पातळीवर हालचाली सुरू असल्याचे दिसून येत आहे. सुरुवातीला विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, खासदार निलेश लंके तसेच शिवसेना शिंदे गटाकडून निवडणुकीत आव्हान उभे करण्याचे प्रयत्न झाले होते.

# भंडाऱ्याची उधळण अन् ढोल-ताशांच्या गजरात तुळजाभवानी पालखीचे गावोगावी स्वागत

## तुळजाभवानी देवीच्या पालखीचे दि १२ऑक्टोबरला नगरला आगमन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

नगर जवळील बुऱ्हानगर येथील भगत मानकरी असलेल्या व सुमारे ८०० वर्षांची परंपरा असलेल्या तुळजाभवानी देवीच्या पालखीचे आगमन नगर शहरात दि १२ ऑक्टोबरला नगरला आगमन होणार आहे अशी माहिती पालखीचे मानकरी सागर भगत यांनी दिली आहे.

महाराष्ट्राची कुलस्वामीनी तुळजाभवानी देवीची पालखी,बु-हाणनगर येथील पालखी राहुरी येथे तयार होऊन राहुरी तालुका, पारनेर तालुका, नगर तालुका, मधील सालाबाद प्रमाणे गावांना पालखी जाऊन तुळजाभवानी देवीची पालखी समोलंघनासाठी तुळजापुरला जाणार आहे.प्रत्येक गावात भंडाऱ्याची उधळण अन् ढोल-ताशांच्या गजरात तुळजाभवानी पालखीचे स्वागत केले जात आहे.

बु-हाणनगर देवी मंदीर येथुन पालखी दांडा पाळणा बनविण्यासाठी राहुरीकडे जातो तिथे पालखी तयार होऊन येथील पालखी मंदीरात दर्शनासाठी बसविण्यात येते २६ सप्टेंबर पासून पालखीचा प्रवास सुरु होतो दि १२ ऑक्टोबरला पालखी हिंगणगाव वरून नगर ला येणार आहे पूर्ण दिवसभर नालेगाव, पोलीस हेडक्वॉर्टर, सर्जेपुरा, रामचंद्र खुंट, येथे थांबून भिंगार कॅम्प बुऱ्हाणनगर जाणार आहे.

गावोगावी पालखी जाऊन योग्य तिथीस योग्य वेळेस यात्रा भरत असून भाविक दर्शनासाठी गर्दी गर्दी करत आहे तर मुक्कामाच्या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रम देवीचा गोंधळ व भक्तिगीते ,भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येत आहे.नवरात्रातील तिसऱ्या माळेला पालखी व पलंगाची भेट मिरवणूक भिंगार येथे होत असून दसऱ्याला पहाटे सिमोलंघनास तुळजापुरला पालखी पोहचणार आहे,पालखी निघाल्यापासून सुमारे ५० गावात जाते.

तुळजापूरच्या तुळजाभवानी मातेला लागणारा पालखी घेऊन येण्याचा मान नगर तालुक्यातील बु-हाणनगर गावाला आहे. येथील रहिवासी भगत यांना आहे,दसऱ्याला सीमोल्लंघनासाठी हीच मूर्ती पालखीत ठेवून मुख्य मंदिराभोवती मिरवली जाते. विशेष म्हणजे पालखी सीमोल्लंघनानंतर लगेचच तोडून होमात टाकली जाते.



# विकसित भारताच्या वाटचालीत विरासत आणि विकासाचा समन्वय!

## ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे प्रतिपादन; अहील्यानगरमध्ये 'विकसित भारत संकल्प सभे'चे आयोजन!

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)











पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची २५ वर्षांची राजकीय कारकीर्द संकल्प, संघर्ष, संघटन, विकास आणि राष्ट्रसेवेला समर्पित राहिली आहे. विश्वमान्य नेतृत्व म्हणून जगभरात त्यांचा गौरव होत असून, विकसित भारताची वाटचाल साध्य करताना विरासत आणि विकासाचा योग्य समन्वय साधण्याचे काम त्यांच्या नेतृत्वाखाली झाले आहे, असे गौरवोद्गार जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी काढले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रातील वाटचालीला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने 'विकसित भारत संकल्प सभे'चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला. जिल्ह्याचे प्रभारी लक्ष्मण सावजी, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, आमदार अक्षय कर्डीले, आमदार विवेक कोल्हे, उपमहापौर धनंजय जाधव, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दिलीप भालसिंग, अध्यक्ष अनिल मोहिते यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. सभेनंतर शहरातून 'सेवा ज्योत यात्रा' काढण्यात आली. महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करून म हाविशाल गणपती मंदिरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी महाआरती करण्यात आली.

पंतप्रधान मोदी यांच्या २५ वर्षांच्या राजकीय प्रवासाचे अभिनंदन करताना ना. विखे पाटील म्हणाले की, हा केवळ एका व्यक्तीच्या राजकीय कारकीर्दीचा प्रवास नसून संकल्प, संघर्ष, संघटन, विकास आणि राष्ट्रसेवेच्या ध्येयाचा प्रवास आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकापासून देशाच्या पंतप्रधानपदापर्यंतचा त्यांचा प्रवास प्रेरणादायी असून, प्रत्येक जबाबदारीमध्ये प्रशासन, विकास आणि जनसहभाग केंद्रस्थानी ठेवण्याचा आदर्श त्यांनी निर्माण केला आहे.

'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' या मंत्राच्या माध्यमातून गरीब, शेतकरी, महिला, युवक, मध्यमवर्गीय, उद्योजक तसेच वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम झाले. जनधन योजनेपासून डिजिटल व्यवहारांपर्यंत, घरकुल योजनेपासून आयुष्मान भारतापर्यंत विविध योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून अंत्योदयाचा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यात आला आहे.

डिजिटल भारताच्या माध्यमातून मोबाईल बँकिंग, डिजिटल पेमेंट आणि सरकारी सेवा सामान्य नागरिकांच्या हातात पोहोचल्या आहेत. यूपीआय ही भारताच्या डिजिटल क्षमतेची जगभरात चर्चिली जाणारी ओळख बनली आहे. आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया यांच्या माध्यमातून उत्पादन, तंत्रज्ञान व नवोन्मेषाच्या क्षेत्रात भारत अधिक सक्षम होत असून स्टार्टअप, संरक्षण उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर, नवीकरणीय ऊर्जा आणि पायाभूत सुविधांमध्ये भारताने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

कृषी क्षेत्रात विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी नव्या संधी निर्माण होत आहेत. युवकांच्या कौशल्याला संधी देण्यासाठी 'स्किल इंडिया' आणि महिलांच्या सहभागाला बळ देण्यासाठी 'नारीशक्ती' हा विकासाचा महत्त्वपूर्ण आधार बनला आहे. स्टॅच्यू ऑफ युनिटीपासून अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरापर्यंतची उभारणी, तीन तलाकविरोधी कायदा आणि कलम ३७० हटविण्याचा ऐतिहासिक निर्णय हे विकसित भारताच्या वाटचालीतील महत्त्वाचे टप्पे असल्याचे ना. विखे पाटील यांनी सांगितले.

विकसित भारताची निर्मिती करण्याचा संकल्प पूर्ण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान देत राष्ट्रनिम ाणाच्या या प्रवासात कटिबद्ध व्हावे, असे आवाहन ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.